# “ पंचवार्षिक योजनांची महिला सबलीकरणा बाबतची भूमिका — नवव्या पंचवार्षिक योजनेच्या विशेष संर्दभात ”


प्रा.डॉ. सुनिता बोर्डे —खडसे
श्रीमती सी.बी.शाह महीला महाविद्यालय , सांगली.




## प्रस्तावना—

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये जगभरातील महिला चळवळीमध्ये सबलीकरण Empowerment हा परवलीचा शब्द बनलेला दिसून येतो. “Empowerment is a process. It seeks to archive this by following objectives.

- To generate awareness among women by disseminating informative and knowledge, so as to bring about an attitudinal change.
- To help women achieve economic strength through micro level income generating activities.
- To establish , convergence of various services such as literacy, health, non formal education, rural development, water supply, entevpreneurship etc.[1] सबलीकरण ही एक बहुअयामी प्रक्रीया असून तिचे प्रमुख घटक पुढीलप्रमाणे आहेत.




सबलीकरणाच्या दृष्टीकोनामुळे महिलांना देशाच्या विकासप्रक्रियेत समानतेने वाटेकरी होण्याची संधी मिळाली. सबलीकरणाच्या दृष्टीकोनाच्या स्वीकारामुळे महिलांमधील निर्णयक्षमता, आत्मनिर्भरता, स्वयंपूर्णता, स्वतंत्रता, अशा विविध गुणांचा विकास होण्यास वाव मिळाला. ‘‘सबलीकरण म्हणजे अशी प्रक्रीया आहे ज्यात व्यक्तिला आपल्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनातील निर्णय घेण्याची क्षमता विकसित करता येते, उत्पादन साधनांवर नियंत्रण प्रस्थापित करता येते व त्याव्दारे तिचा आत्मविश्वास वाढतो.’’[२] भारतीय

स्त्रियांच्या परावलंबित्वाचे व दुय्यमत्वाचे मूळ त्यांच्या आर्थिक परावलंबीत्यातून निर्माण झालेल्या पुरूषसत्तेत व पुरूषसत्तेच्या नियंत्रणातून आलेल्या मानसिक दुर्बलतेत आहे की बाब सर्वश्रृत आहे. त्यामुळेच स्त्रियांच्या सबलीकरणासाठी त्यांना आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण करणे आवश्यक आहे ही बाब आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये नियोजन कर्त्यानीं क्रेद्रस्थानी ठेवली आणि त्यादृष्टीने स्त्रियांच्या सबलीकरणाच्या विविध योजनांचा आराखडा आखला स्त्रियांना खऱ्या अर्थाने सबल करण्यासाठी आवश्यकता आहे ती त्यांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी करण्याची, संपत्तीत समान वाटा देण्याची त्यांना शिक्षण देण्याची, अधिक संघटीत करून त्यांना त्यांच्या स्वातंत्र्याबद्दल व हक्कांबद्दल जागरूक करण्याची, मानसिक दृष्ट्या स्वावलंबी करण्याची, पुरूषांची, समानाची मानसिकता बदलण्याची, मूल्य व्यवस्था बदलण्याची आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांच्यावरील घरकाम, बालसंगोपन, जळणपाणी या कामांचा बोजा कमी करण्याची. त्यामुळे पुरूष सार्वजनिक जीवनाबरोबरच कौटुंबिक जबाबदाऱ्याही स्त्रियांच्या बरोबरीने पार पाडतील आणि स्त्रिया कौटुंबिक जबाबदाऱ्यां बरोबरच सार्वजनिक जीवनात पुरूषांच्या बरोबरीने काम करतील. जर स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढला तरच त्यांना सार्वजनिक पातळीवरील निर्णय प्रक्रियेत सहभागी होता येईल व पर्यायाने त्यांच्या सक्षमीकरणाला हातभार लागेल, त्यास गती येईल.[३]

## नववी पंचवार्षिक योजना ( १९९७—२००२ )

महिलांच्या सबलीकरणाच्या दृष्टीने अतिशय महत्वाची योजना म्हणजे नववी पंचवार्षिक योजना होय.या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच महिलांच्या सबलीकरणाला पंचवार्षिक योजनांच्या प्रमुख उद्दिष्टांमध्ये स्थान मिळाले. "Empowerment of women" being one of the nine primeary objectives of the nineth plan, every effort will be made to create an enabling environment where women can freely exercise their right both within and outside home, as equal parteners along with men.[4] नवव्या पंचवार्षिक योजनेंच्या नऊ प्राथमिक उद्दिष्टांपैकी एक होते, "Empowering women as the Agent of social change and Development"[5]

स्त्रीयांच्या कल्याणाच्या दृष्टीकोनापासून सबलीकरणाच्या दृष्टीकोनापर्यंच्या वाटचालीचे प्रतिक म्हणजे हे उद्दिष्ट होय. ''स्त्रिया हा केवळ एक दुर्बल गट समजून त्यांच्या कल्याणाची काळजी वाहणे पुरेसे नाही. त्यांची श्रमशक्ती व कौशल्य हे आर्थिक विकासाचे महत्वाचे साधन आहे, आणि त्याचा योग्य वापर करण्यावर नियोजनाचे भवितव्य अवलंबून आहे.[६] ही बाब नियोजनकत्यांनी या निमित्ताने लक्षात घेतली हेच या योजनेचे फलित आहे.

## नवव्या पंचवार्षिक योजनेची स्त्री सबलीकरणा बाबतची भूमिका —

नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये सामाजिक बदल आणि विकासाचे दूत म्हणून महिलांचे सबलीकरण करण्याची वचनबध्दता जाहीर करण्यात आलेली होती. या वचनाच्या पूर्ततेसाठी नवव्या पंचवार्षक योजनेने महिला सबलीकरणाबाबत पुढील प्रकारची भूमिका व व्यूहरचना यांचा अवलंब करण्याचे धोरण स्वीकारले.

१. राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरणाच्या माध्यमातून, स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने कुंटुंबांतर्गत आणि कुंटुंबाबाहेर स्वत:च्या अधिकारांचा उपभोग घेण्यास समर्थ बनविण्याऱ्या वातावरणाची निर्मिती करणे.

२. स्त्रियांना निर्णय प्रक्रीयेत पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे यासाठी त्यांना संसदेत आणि राज्य विधीमंडळांमध्ये त्यांच्यासाठी १/३ पेक्षा कमी नसणाऱ्या जागांवर आरक्षण ठेवण्यासाठी त्वरीत कार्यवाही करणे.

३. 'Women's Component Plan' चे विशेष धोरण स्वीकारून इतर विकास क्षेत्रातील कमित कमी निधि व फायदे स्त्रियांना मिळतील याकडे विशेष लक्ष पुरविणे.

४. स्त्रियांची पुनरूत्पादकता व बालआरोग्य यांची काळजी घेण्यात सर्वोच्य प्राधान्य देणे.

५. पुरक आहार योजना, विशेष आहार कार्यक्रम तसेच मध्यान योजना या सध्या अस्तित्वात असलेल्या योजनांचे सार्वत्रीकीकरण करणे.
६. १९९८ च्या विशेष कृती कार्यक्रमानुसार स्त्रिया आणि मुलींना सुलभ आणि समानरित्या शिक्षणाची संधी प्राप्त होईल याकडे लक्ष पुरविणे.
१. सर्व शैक्षणिक कार्यक्रमांमधील लिंगभेदांचे उच्चाटन करण्यासाठी विशेष पाऊले उचलणे.
२. मुलींना महाविद्यालयीन शिक्षण तसेच व्यावसायिक शिक्षण मोफत उपलब्ध करून देण्यासाठी योजना आखणे.
३. स्त्रियांना आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र व स्वयंपूर्ण बनविण्यासाठी आवश्यक कौशल्य प्राप्त करून देणे, जेणे करून त्या आधुनिक प्रवाहात टिकाव धरून स्वत:ला सिध्द करू शकतील.

## २) स्टेप (Support of Training and Employment Programme 1987 )

महिलांची उद्योजकता वाढीस लागावी, त्यांना रोजगार उपलब्ध व्हावा आणि त्या माध्यमातून स्त्रियां आर्थिक दृष्टया सक्षम व्हाव्यात या हेतून केंद्र सरकारच्या वतीने STEP ही योजना इ.स.१९८७ मध्ये सुरू करण्यात आलेली होती. नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये STEP च्या प्रभावी अंमलबजावणीकडे लक्षपुरविणचे धोरण स्वीकारण्यात आले होते. या योजनेखाली शेती , लघूउद्योग, पशूसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्य पालन, हातमाग, हस्तव्यवसाय, खादी व ग्राम उद्योग रेशीम उद्योग या क्षेत्रातील प्रकल्प हाती घेण्यासाठी केंद्र शासनामार्फत प्रकल्पाच्या ९० टक्के अनुदान मंजूर करण्यात येते व १० टक्क खर्च संबंधीत संस्थेला करावा लागतो.[७] इ.स.१९८७ मध्ये या योजनेचा प्रारंभ झाल्यापासून सन २००० पर्यत महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, बिहार, गुजरात, हरियाना, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, मणिपूर, नागालॅंड, ओरिसा, तमिळनाडू, त्रिपूरा, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये एकूण ९६ विविध प्रकल्पांअंतर्गत जवळपास ४,९१,७९५ स्त्रियांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे.

## ३) नोरॅड (NORAD)

नॉर्वे एजन्सी फॉर डेव्हलपमेंट कोऑपरेशन च्या सहाय्याने चालविण्यात येणारी ही योजना Setting up of employment – cum income generation-cum production units म्हणून ओळखली जाते. १९८२—८३ मध्ये प्रारंभ झालेल्या या योजनेचे मुख्य ध्येय गरीब व गरजू महिलांचे जीवनमान उंचावणे हे आहे. नागरी भागातील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या तसेच ग्रामिण भागातील अल्प उत्पन्न गटातील स्त्रियांना प्रशिक्षण, रोजगार तथा उत्पादक केंद्र चालू करण्यासाठी केंद्र शासनाने ही योजना सुरू केलेली आहे. या योजनेअंतर्गत स्वयंसेवी संस्था,शासन अंगीकृत उपक्रम यांना प्रकल्प हाती घेता येतात. यामध्ये प्रकल्पनिहाय गुणवत्तेनुसार अनुदान मंजूर करण्यात येते. प्रति प्रशिक्षणार्थी किमान रू. ८०००/— च्या मर्यादित सहा. अनुदान देण्यात येते.[८] नवव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात १३ नोव्हेंबर १९९७ रोजी या योजनेला पुढील पाच वर्षांची मुदतवाढ देण्यासाठी भारत सरकार आणि नॉर्वे सरकार यांच्यामध्ये करार झाला. या करारानुसार नॉर्वे सरकारने NORAD च्या १९९७—२००२ या काळातील अंमलबजावणीसाठी एकूण २० करोड रूपयांचा निधी देण्याचे मान्य केले. त्यामुळे या पंचवार्षिक योजनाकाळात गरीब महिलांच्या आर्थिक मदतीसाठी प्रोत्साहन मिळाले. Development Bank for women Enterpreneurs" ची स्थापना करून स्त्रियांना लघूउद्योगांसाठी भांडवल उपलब्ध करून देणे.[९]

स्त्रियांच्या सबलीकरणासाठी नवव्या पंचवार्षिक योजनेने वरीलप्रमाणे धोरणे व भूमिका स्वीकारली होती. तिच्या पूर्ततेसाठी या योजना काळात पुढील महत्वपूर्ण बाबी पूर्ण करण्यात आल्या.

### १. एकात्मिक महिला सबलीकरण कार्यक्रम (Intigrated women's Empowerment programme (IWEP) 2001

आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये महिलांच्या सबलीकरणासाठी 'इंदिरा महिला योजना' ही योजना सुरू करण्यात आली होती. नवव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात तिचेच पूनर्जीवन करण्यात येऊन तिला. एकात्मिक महिला सबलीकरण कार्यक्रम (IWEP) असे नविन नाव देण्यात आले. या योजनेत महिला सबलीकरणाची पुढील भूमिका स्विकारण्यात आली होती.

१. माहिती आणि ज्ञानाचा प्रसार करून स्त्रियांमध्ये जागरूकता निर्माण करणे.
२. लहान—लहान पातळीवर उत्पन्न मिळवून देणारे उद्योग व व्यवसाय हाती घेऊन स्त्रियांना आर्थिक शक्ती प्राप्त करण्यासाठी मदत करणे.
३. स्त्रियांच्या सबलीकरणासाठी असणाऱ्या साक्षरता, आरोग्यसेवा, अनौपचारिक शिक्षण, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, प्रशिक्षण, या सारख्या विविध योजनांमध्ये समन्वय प्रस्थापित करणे.

'Merged with the programme of Mahila samriddhi yojana, IWEP will be an effective instrument for empowering women , both socially and economically."[10] या योजनेमुळे स्त्रियांना स्वयंसहायता गटांमधून संघटीत करण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यात आला. इ.स.२००० या वर्षाच्या अखेरपर्यंत देशभरात ४२००० महिला स्वयंसहायता गटांची स्थापना करण्यात यश आले होते.

### ६) जागरूकता आणि लिंगभाव संवेदनक्षमता मोहिम —

महिला आणि मुलींकडे बघण्याची समाजाची नकारात्मक मानसिकता हा स्त्री सबलीकरणाच्या मार्गातील फार मोठा अडसर आहे ही बाब ओळखून नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये महिला आणि मूलींच्या प्रति समाजाची ही मानसिकता बदलण्यासाठी प्राधान्यक्रमाने सर्वोतोपरी प्रयत्न करण्यावर भर देण्यात आला. प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून महिला आणि मूलींकडे बघण्याची सकारात्मक मानसिकता निर्माण करण्यासाठी जागरूकता मोहिम हाती घेण्यात आली. या मोहिमेचाच एक भाग म्हणून स्त्रियांमध्ये कायदेविषक साक्षरता निर्माण करण्यासाठी १९९२ मध्ये दहा पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले होते. स्त्रियांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची माहिती देणारे हे साधनग्रंथ अतिशय सोप्या आणि सरळ भाषेत मांडण्यात आले होते. त्यामुळे अगदी नवशिक्षित व अर्धशिक्षण स्त्रियांपर्यंत त्यातील संदेश सुलभपणे पोहचू शकला.

### ७) महिला सबलीकरण वर्ष २००१ :—

नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये महिलांचे सबलीकरण हा एक प्रमुख उद्देश समोर ठेवला गेला होता, त्यादृष्टीने या योजना काळामध्ये स्त्रियांच्या सबलीकरणाच्या विविध योजना व कार्यक्रम राबविण्यात आले. गेली १५—२० वर्षे आपल्या पंचवार्षिक योजनांमधून सबलीकरण आणि महिला सक्षमीकरण या बाबींवर विशेष भर दिला गेला आहे, आणि पुढील योजनांमध्ये अधिकच राहणार आहे.[११] त्यातीलच पुढचे पाऊल म्हणजे भारत सरकारने २००१ हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष म्हणून घोषित केले. महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय धोरण याच योजनाकाळात जाहिर करण्यात आले. "महिला सक्षमीकरणासाठी शिक्षण हे प्रभावी अस्त्र असल्यामुळे या योजनाकाळात महिलांच्या शिक्षणाला अग्रक्रम देण्यात आला."[१२]

### ४) सामाजिक — आर्थिक कार्यक्रम

सामाजिक—आर्थिक कार्यक्रमा अंतर्गत गरजू स्त्रियांना रोजगार आणि मजूरी उपलब्ध करून दिली जाते. या योजनेचा लाभ प्रामुख्याने विधवा, परित्यकत्या, असक्षम महिलांना दिला जातो. नवव्या पंचवार्षिक योजनेच्या समाप्ती पर्यंत सामाजिक आर्थिक कार्यक्रम या योजनेखाली ५० नवीन कार्यक्षेत्र सुरू करण्याचे धोरण आखण्यात आले होत.

### ५) सहायक सेवा —

महिलांसाठी असणाऱ्या सहायक सेवांअतंर्गत इ.स. १९७३ मध्ये नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतीगृहांची योजना सुरू करऱ्यात आलेली होती. नवव्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या कालखंडापर्यंत देशभरात ८६१ वस्तीगृहाची स्थापना करण्यात येऊन त्यामाध्यमातून ६०,८६५ कम करण्याऱ्या स्त्रियांना सुरक्षित व माफक दरातील निवासव्यवस्था पुरविण्यात आलेली होती. या योजनेप्रमाणेच सामाजिक आणि नैतिकदृष्ट्या संकटात सापडलेल्या स्त्रियांच्या अल्प वास्तवासाठी अल्पमुदत निवास गृहांची योजना ही इ.स. १९६९ पासून सुरू करण्यात आलेली होती, तिचा विकास करण्याचा प्रयत्न नवव्या पंचवार्षिक योजनेत करण्यात आला. १९९९—२००० या काळात योजनेचा पूर्वआढावा घेण्यात आला. नवव्या योजनेच्या काळात देशभरात एकूण ३३९ अल्पमुदत निवासगृहे होती तर त्याचा लाभ घेणाऱ्या कार्यक्रम मूल्यमापन समितीने केले. त्यांनी केलेल्या शिफारसींच्या आधारे ही योजना केंद्रीय समाज कल्याण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली.

### समारोप

शासकीय पातळीवरून प्रत्येक पंचवार्षिक योजनेअंतर्गत स्त्रियांच्या आर्थिक विकासासाठी भरीव प्रयत्न केले जातात त्यासाठी मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला जातो. नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी वसतीगृहे, स्टेप,नोरॅड, राष्ट्रीय महिला कोष,स्वयंसिध्दा,महिला मंडळांना सहाय्यक अनुदान ,मुलींना व्यावसायिक प्रशिक्षण ,स्वयंरोजगारासाठी व्यक्तिगत अनुदान ,निराधार महिलांच्या मुलींसाठी विवाह अनुदान ,लक्ष्मी मुक्ती योजना ,कामधेनू योजना अशा विविध योजना केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यावतीने राबविण्यात येतात. तसेच जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने स्त्रियांच्या आर्थिक विकासासाठी विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येतात.

### संदर्भ

१) महिलांचे सबलीकरण दारिद्रय निर्मूलन हा स्वयंसहायता गट, यशवंतराव चव्हाण महारा ट्र मुक्त विद्यापीठ, पृ. ५०.
२) पाटील भारती, स्त्रियांचा सत्तेतील सहभाग, सबलीकरणाच्या प्रक्रियेतील महत्वाचा टप्पा, समाजवादी प्रबोधिणी इचलकरंजी, १९९८, पृ. ५४
३) उपरोक्त पृ. ५५
४) Indian planning commission,9th five year plan vol.2,empowerment of women and development of children, p. 7
५) उपरोक्त
६)पंडीत नलिनी, स्त्रिया आणि आर्थिक विकास, अर्थसंवाद, जाने.—मार्च १९८९ ए पृ. १५
७) श्रीगोंदेकर सुधीर, महिला विकास आणि योजना, महिला मंच प्रकाशन पुणे. २००९, पृ. १०९
८) श्रीगोंदेकर सुधीर, महिला विकास आणि योजना, महिला मंच प्रकाशन पुणे. २००९, पृ. १०९
९) Indian planning commission, 9th five year plan, Empowerment of womean and Development of children, p.8.
१०) Ibid
११) आपटे, रोडे , भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००८, पृ८७
१२) जगदाळे आशा, पंचवार्षिक नियोजन व महिलांचा श्रमसहभाग, अर्थसंवाद, जुलै—सप्टे. २०१२, पृ.२००८